विमा संचालनालयाच्या आस्थापनेवरील विमा उप संचालक (गट-अ), विमा सहायक संचालक (गट-अ) आणि तांत्रिक सहायक (गट-क) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा वाढविण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्र. विमासं-२०१९/प्र.क्र.३५/विमा प्रशासन,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०३ जुलै, २०१९

<u>पहा</u> : १) वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र.डीओआय-११८०/सीआर-३६४१/एडीएम-५, दि.२४.०१.१९८३
२) वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र.प्रविनि-१०४९/प्र.क्र.५५५/८८/शहमी, दि.२१.०९.२००१
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दि.२५.०४.२०१६

<u>प्रस्तावना</u> :

विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील विमा उप संचालक (गट-अ) आणि विमा सहायक संचालक (गट-अ) पदाचे सेवाप्रवेश नियम दि.२४.०१.१९८३ च्या शासन अधिसूचनेअन्वये आणि तांत्रिक सहायक (गट-क) पदाचे सेवाप्रवेश नियम दि.२१.०९.२००१ च्या शासन अधिसूचनेअन्वये विहित करण्यात आले आहेत. सदर पदासाठी आवश्यक विमाविषयक अर्हता आणि पूर्वानुभव विचारात घेऊन त्यावेळी अन्य शासकीय सेवांकरिता असलेल्या कमाल वयोमर्यादेशी सुसंगत कमाल वयोमर्यादा ठेवण्यात आली होती. सामान्य प्रशासन विभागाने दि.२५.०४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील सेवाप्रवेशासाठी खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे आणि मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे अशी वयोमर्यादा विहित केली आहे. त्या अनुषंगाने विमा संचालनालयातील सदर पदांवर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील विमा उप संचालक (गट-अ) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षावरुन खुल्या प्रवर्गासाठी ४५ वर्षे आणि मागासवर्गीय किंवा शासन सेवेत असलेल्या उमेदवारांकरिता ४८ वर्षे अशी विहित

करण्यात येत आहे. विमा सहायक संचालक (गट-अ) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षांवरुन खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४० वर्षे आणि मागासवर्गीय किंवा शासनसेवेत असलेल्या उमेदवारांकरिता ४३ वर्षे अशी विहित करण्यात येत आहे. तसेच तांत्रिक सहायक (गट-क) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ३० वर्षांवरुन खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे अशी विहित करण्यात येत आहे.

२. उपरोक्त पदांच्या सेवाप्रवेश नियमात याप्रमाणे सुधारणा करण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला त्याचा संगणक संकेतांक २०१९०७०४१२३९३८३७०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHUBHANGI RAJAN SHETH

Digitally signed by SHUBHANGI RAJAN SHETH
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=e52a2ce9d32e66b1d24d51eaca64e3ebef79bd73ef9543b72097c742eb1e708a, ou=FINANCE , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHUBHANGI RAJAN SHETH
Date: 2019.07.04 12:43:51 +05'30'

(शुभांगी शेठ)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (वित्त) यांचे सचिव
२) मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
३) प्रधान सचिव (ले.व को.) यांचे स्वीय सहायक.
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
५) संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१२, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती, विमा प्रशासन.